# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र






०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ५९८ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०९/११/२०१८

## "दिनांक १०/११/२०१८ रोजी विविध ठिकाणी फिरते पोलीस स्टेशन (मोबाईल पोलीस स्टेशन) चे आयोजन "

भंडारा:– भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे आयोजित विविध उपक्रमा पैकी एक असलेल्या फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक १०/११/२०१८ रोजी आयोजित करण्यात आले आहे. शनिवार दिनांक १०/११/२०१८ रोजी भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन १)पवनी अंतर्गत ग्राम परसोडी ,२) पो. स्टे. अडयाळ अंतर्गत ग्राम श्शेगाव ३) पो. स्टे. जवाहरनगर अंतर्गत ग्राम लोहारा, ४)पो. स्टे. भंडारा अंतर्गत ग्राम कोरंभी ५) पो. स्टे. मोहाडी अंतर्गत ग्राम मांढळ ६) पो. स्टे. आंधळगाव अंतर्गत ग्राम हरदोली ७) पो. स्टे. तुमसर अंतर्गत ग्राम हिंगणा ८) पो. स्टे. सिहोरा अंतर्गत ग्राम बोरगाव ९) पो. स्टे. साकोली अंतर्गत ग्राम वांगी, १०) पो. स्टे. लाखनी अंतर्गत ग्राम लाखोरी ११) पो. स्टे. पालांदुर अंतर्गत ग्राम मरेगाव १२) पो. स्टे. लाखांदुर अंतर्गत कुडेगाव १३) पो. स्टे. गोबरवाही अंतर्गत ग्राम गोबरवाही १४) पो. स्टे. दिघोरी अंतर्गत ग्राम दांडेगाव १५) पो. स्टे. कारधा अंतर्गत खमारी १६) पो. स्टे. वरठी अंतर्गत एकलारी १७) पो. स्टे. करडी अंतर्गत ग्राम ढिवरवाडा या ठिकाणी आयोजित होणार असुन पोलीस स्टेशनचे अधीकारी व बिट जमादार हे हजर राहणार आहेत तसेच सदर कार्यक्रमामध्ये गावातील पोलीस पाटील, सरपंच, पोलीस मित्र, माहात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष/ सदस्यगण व सामाजिक कार्यकर्ते हजर राहणार आहेत. भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे की, आजुबाजूचे गावातील/ परीसरातील सर्व नागरिकांनी फिरते पोलीस स्टेशन कॅम्पला हजर राहुण त्याचे समस्या मांडुन संमस्यांचे निराकरण करावे. सुज्ञ नागरीकांनी मोठया संख्येने उपस्थित राहून सहभाग घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक, भंडारा, श्रीमती विनीता साहू यांनी केले आहे.

(अमोल व्हि.तुळजेवार )<br>
पोलीस उपनिरीक्षक<br>
जनसंपर्क अधिकारी<br>
संपर्क क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता